विशेष शाखा, पिंपरी चिंचवड,
प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे - ३३
दुरध्वनी क्र. ०२०-२७३५०१२०
ई मेल आयडी – dcphq.pcpc-mh@gov.in

जा.क्र/ पो.आ /२८५८/२०२३, पिंपरी चिंचवड, दि. २८/०३/२०२३

## प्रतिबंधात्मक आदेश

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहीता १९७३ चे कलम १४४(१) नुसार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या सांगवी व तळेगाव एमआयडीसी पोस्टे हद्दीमध्ये पॅराग्लायडींग, पॅरामोटर्स, हॅंग ग्लायडर्स,मायक्रो लाईट एअरोप्लेन, हॉट एअर बलुन, प्रायव्हेट हेलिकॉप्टर यांचे उड्डाण व ड्रोन द्वारे छायाचित्रीकरण (शुटिंग) करण्यास व कोणत्याही प्रकारचे ड्रोन उडविण्यास प्रतिबंधात्मक आदेश.**

**संदर्भ :- व्हीएस/नलावडे, कॉलोनेल जनरल स्टाफ, कमांडींग हेडक्वाटर दक्षिण महाराष्ट्र आणि गोवा सब एरिया सी/ओ ५६ एपीओ, १०११/एलओ/जीएस(एसडी) यांचेकडील प्राप्त गोपणीय पत्रान्वये...**

-----ooo-----

ज्याअर्थी, अतिमहत्वाची व्यक्ती ही दिनांक २९/०३/२०२३ रोजी पिंपरी चिंचवडच्या दौ-यावर असून ते भेटी दरम्यान सांगवी पोलीस स्टेशन हद्दीतील रक्षक सोसायटी, औंध येथील आर्मीच्या क्षेत्रामध्ये व तळेगाव एमआयडीसी पोस्टे हद्दीतील एल ॲण्ड टी कंपनी याठिकाणी भेटीस येत आहे. क्रिमीनयर न्यु दिल्ली जॉईन्ट डायरेक्टर/व्हीएस २३/व्हीएस/२०२२(१) दि. ३०/११/२०२२ यांचेकडील प्राप्त पत्रान्वये अतिमहत्वाच्या व्यक्तींचे भेटी दरम्यान सुरक्षेच्या दृष्टीने घावयाच्या दक्षतेबाबत सुचनांचे पत्र प्राप्त झालेले आहे.

अतिमहत्वाची व्यक्ती ह्या पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयांच्या हददीतील सांगवी पोलीस स्टेशन हद्दीतील रक्षक सोसायटी, औंध येथील आर्मीच्या क्षेत्रामध्ये व तळेगाव एमआयडीसी पोस्टे हद्दीतील एल ॲण्ड टी कंपनी येथे येणार आहेत. त्यांना नक्षलवादी संघटना, अतिरेकी संघटना अशा अनेक संघटनापासून त्यांच्या जिवीतास धोका असल्याने व त्यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी त्यांच्याबरोबर इतर महत्वाचे व्हीव्हीआयपी असल्याने सदर ठिकाणी मोठया प्रमाणात गर्दी होवून.काही लोक ड्रोनव्दारे किंवा ड्रोन सदृश्य कॅमेराव्दारे छायाचित्रण (शुटींग) करण्याची व ड्रोन उडविण्याची शक्यता नाकारता येत नाही,त्यामुळे अलिकडच्या काळातील वाढते दहशतवादी हल्ल्यांचा, घातपात कारवायांचा विचार करता ड्रोन सारखे इलेक्ट्रीक साधन वापर करुन घातपात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याबाबत माझी खात्री झाली आहे.

त्याअर्थी, मी विनयकुमार चौबे पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय, मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ च्या कलम १४४(१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार जारी करण्यात आलेले प्रतिबंधात्मक आदेश कायम ठेवुन.पुणे जिल्ह्यातील सांगवी पोलीस स्टेशन हद्दीतील रक्षक सोसायटी, औंध येथील आर्मीच्या क्षेत्रामध्ये व तळेगाव एमआयडीसी पोस्टे हद्दीतील एल ॲण्ड टी कंपनी क्षेत्रामध्ये तसेच व्हीव्हीआयपी यांचे येण्याजाण्याच्या मार्गालगत ०३ किलोमीटरच्या आजुबाजुच्या परिसरामध्ये व संपुर्ण सांगवी व तळेगाव एमआयडीसी पो.स्टे पिंपरी चिंचवड हद्दीमध्ये दिनांक २९/०३/२०२३ रोजी ००.०० पासून ते दिनांक ३०/०३/२०२३ रोजीच्या २४/०० वा.पर्यंत पॅराग्लायडींग, पॅरामोटर्स, हॅंग ग्लायडर्स , मायक्रो लाईट एअरोप्लेन, हॉट एअर बलुन, प्रायव्हेट हेलिकॉप्टर यांचे उड्डाण व ड्रोनव्दारे किंवा ड्रोन सदृश्य कॅमेराव्दारे छायाचित्रण (शुटींग) करण्यास तसेच कोणत्याही प्रकारचे ड्रोन उडविण्यास **प्रतिबंध करण्यात येत आहे.**

उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहीती प्रसार माध्यमे, पोलीस स्टेशन, सहा. पोलीस आयुक्त, परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदर मनाई आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांवर भारतीय दंड विधान संहिता कलम १८८ प्रमाणे कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश दि. - २८/०३/२०२३ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला आहे.

**( विनयकुमार चौबे )**
**पोलीस आयुक्त**
**पिंपरी चिंचवड**

पोलीस आयुक्त पिंपरी-चिंचवड

**तारीख- २८/०३/२०२३**
**ठिकाण- पिंपरी चिंचवड**